# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक २१.०५.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— हद्‌पार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

अ)दिनांक २१.०५.२०२६ चे १०.३० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्‌दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, भाऊचा धक्का हॉटेलसमोरील मोकळया मैदानात एक हद्यपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नितेश उर्फ बच्चा गुणवंत कालभुत वय ३० वर्षे रा. इंदीरामाता नगर, हनुमान मंदीरजवळ, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत आरोपीचे एक लोखंडी धारदार चाकु मिळून आल्याने किंमती ५००/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्‌दपार आदेश क्र. १४/२०२४, दिनांक २८.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्‌दीतुन ०२ वर्षाकरीता हद्‌दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्‌दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्‌दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

ब) दिनांक २१.०५.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्‌दीत पेट्रोलींग करीत असता, कोची धर्मकाटा, देशमुख ट्रेडींग चौक समोर मोकळया जागेत एक संशयीत इसम दिसल्याने त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहून पळू लागल्याने त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव पवन उर्फ किस्सी तुळशीराम कोरडे वय २८ वर्षे रा. इंदीरामाता नगर, बुध्द मुर्तीजवळ, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत आरोपीचे एक लोखंडी धारदार चाकु मिळून आल्याने किंमती ३५०/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्‌दपार आदेश क्र. ०९/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्‌दीतुन ०२ वर्षाकरीता हद्‌दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्‌दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्‌दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतिशकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (सोनेगांव विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. गोकूळ महाजन, मपोउपनि. रेश्मा सरगर, पोहवा राजेश वरठी, दीपक ठाकूर, गजानन राठोड, पोअं. सचिन सोनवणे, सचिन कावळे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २१.०५.२०२६ चे ००.२० वा. चे सुमारास, गिट्टीखदान पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, हजारीपहाड ते भिवसनखोरी रोड, सरोजिनी पब्लिक स्कुलसमोर समोर एक ईसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा एक ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी कोयता काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राकेश बाबुलाल कौल वय ३५ वर्षे, रा. चिंतामण नगर, साई हार्डवेअर जवळ, गिट्टीखदान नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी कोयता किंमती अंदाजे २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बजाजनगर :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी साहील राजकुमार जयस्वाल वय २७ वर्षे, रा. क्वॉर्टर क्र. १७०/०४, सोमवारी क्वॉर्टर, सक्करदरा, नागपूर यांची ओळख आरोपी क्र. १) दुर्गेश त्रिभुवन सिंग वय ३८ वर्ष २) त्रिभुवन तेजबली सिंग वय ६७ वर्ष दोन्ही रा. ६०१, अथर्व हेरीटेज अपार्टमेंट, अथर्व नगरी, बेसा, पिपळा रोड, नागपूर यांचे सोबत फिर्यादीचा मित्र अक्षय दुबे यांचे मार्फतीने झाली होती. पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत, श्रीजी ऑटोमोबाईल, अभ्यंकर नगर, नागपूर येथे आरोपींनी फिर्यादीस फ्लॅट क्र. ६०१, अथर्व हेरीटेज अपार्टमेंट, अथर्व नगरी, बेसा, पिपळा रोड नागपूर हा विकायचा आहे असे सांगितले असता फिर्यादीने नमुद फ्लॅटचा सौदा ३०,०५,०००/— रु. मध्ये करुन आरोपीस ७,३५,०००/— रु. चेकद्वारे दिले. तसेच दिनांक १९.०७.२०२४ ते दिनांक ११.०४. २०२५ चे दरम्यान वेळोवेळी रोख १७,६५,०००/— रु. असे एकूण २५,००,०००/— रु. दिले. दिनांक ११. ०५.२०२५ रोजी आरोपींनी फिर्यादीस फ्लॅटचे ॲग्रीमेंट करुन कागदपत्रे दिली व फिर्यादीस रजिस्ट्रीकरीता सहा महिन्यांचा वेळा मागितला. सहा महिने संपल्यावर फिर्यादीने आरोपींना रजिस्ट्री करण्यास म्हटले असता आरोपींनी टाळाटाळ केली. फिर्यादीने फ्लॅटचे कागदपत्रे तपासली असता कागदपत्रे बनावट असल्याचे निदर्शनास आले. यातील आरोपी यांनी फिर्यादीस फ्लॅटचे खोटे व बनावटी दस्तऐवज देऊन फिर्यादीकडुन वेळोवेळी एकुण २५,००,०००/—रू. घेवुन पैसे परत न करता फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोउपनि पंकज बावणे ८३९०४५८४०१ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४),३३६(३),३३८,३(५) भान्यास. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे अंबाझरी. :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २५.०१.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे भाऊ नामे सुनिल किरण बोरकर वय ४० वर्षे, रा. घर क्र. ७९, बुध्द विहारजवळ, द्रुगधामणा, नागपूर हे त्यांचे शाईन मोटरसायकल क्र. एमएच ४०

एझेड ७६५३ ने पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, कॅम्पस चौक ते बोले पेट्रोल पंप चौककडे जाणारे उडाणपुलावर बेशुध्द व जखमी अवस्थेत मिळाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले होते. पोलीस ठाणे अंबाझरी येथे अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली होती. अकस्मात मृत्यूचे चौकशीत तसेच प्रत्यक्षदर्शी यांनी दिलेल्या बयाणानुसार फिर्यादीचे भावाचे मोटारसायकलला उडाणपुलावर आयकॉन हॉस्पिटल समोर काळया रंगाच्या क्रेटा चारचाकी कार क्र. एमएच ४९ बीके ९९९२ चे चालकाने त्याचे ताब्यातील कार निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवून धडक देऊन गंभीर जखमी करुन त्यांचे मरणास कारणीभूत झाला.

यापकरणी फिर्यादी पवन किरण बोरकर वय ४२ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. सतिश मेश्राम यांनी आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे एमआयडीसी</u> :—** दिनांक २०.०५.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, फिर्यादी व त्याचे मित्र यश मोरेश्वर बेलखेडे वय २१ वर्ष रा. हिरणवार ले आऊट, राही सभागृह मागे, जयताळा, नागपूर व रितेश हराडे हे पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत संघर्षनगर, जयताळा येथील राजू पाटील यांचे शेतात आंबे तोडायला गेले होते. शेतातील विहीरीमध्ये यश मोरेश्वर बेलखेडे हा पोहण्याकरीता उतरला असता, विहीरीचे पाण्यात बुडाल्याने मरण पावला.

यापकरणी फिर्यादी अंशुल राजेश चांदणे वय २२ वर्ष रा. संघर्षनगर, जयताळा, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. पंकज सयाम ९४०५५४५४२७ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे वाठोडा</u> :—** दिनांक २१.०५.२०२६ चे ११.५० वा. चे सुमारास पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत दिघोरी चौक, सरताज गादी भंडारसमोर, उडाणपुलाखाली एक अनोळखी इसम वय अंदाजे ६० वर्ष वयाचे रंग सावळा, केस काळे व पांढरे, दाढी मिशी—बारीक, अंगात पांढरा कुर्ता व पांढरा पॅन्ट घातलेल्या वर्णनाचे बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. कृष्णा साळुंखे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे अंबाझरी</u> :—** सुभाष भोलानाथ बन्सोड वय ४९ वर्षे, रा. श्रध्दा अपार्टमेंट, दुसरा माळा, फ्लॅट क्र. बी—२, भिमचौक, जरीपटका, नागपूर हे दिनांक १८.०५.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील आपले घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>**— रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ३ इंच, अंगात पांढरी टिशर्ट, काळा लोअर व पायात कत्था रंगाची सॅन्डल घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. **<u>ओळख— शरीराचे उजव्या बाजुला लकवा मारलेला आहे.</u>**

**<u>२) पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** कृष्ण संजय चोईतरामानी वय १९ वर्षे, रा. अशोक कुमार यांचे घरी किरायाने, अपेक्स हॉस्पिटल समोर, जरीपटका, नागपूर हा दिनांक १६.०५.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास पोलीस

ठाणे जरीपटका हद्दीतील आपले घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. <u>**वर्णन**</u>– रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–साधारण, उंची– ५ फुट ५ इंच, अंगात काळी टिशर्ट, काळा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह–उजवे हातावर हरीणाचा टॅटू गोंदलेला आहे.

<u>**३) पोलीस ठाणे जरीपटका**</u> **:–** सौ. विनिता मनोरंजन उईके वय ४४ वर्षे, रा. तिरथ प्रजापती यांचे घरी किरायाने, विटभट्टी आऊटर रिंग रोड, समतानगर, जरीपटका, नागपूर ह्या दिनांक २१.०४.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. <u>**वर्णन**</u>– रंग–सावळा, चेहरा– गोल, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट, अंगात– लाल रंगाची साडी व पायात पॅरागॉन चप्पल घातलेली आहे. सोबत भाषा– हिंदी बोलतात.


सुभाष


कृष्ण


सौ. विनिता

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**